पनवेलमधील बेपत्ता तरुणी सापडली

नवी मुंबई, दि. ८ (वार्ताहर)- पनवेलच्या के.व्ही.कन्या शाळेतून बेपत्ता झालेल्या १६ वर्षीय तरुणीला शोधण्यात गुन्हे शाखा युनिट-२च्या पथकाला यश आले आहे. ही तरुणी आश्रमात रहाण्यास कंटाळल्याने ती स्वत:हुन आपल्या ओळखीतल्या महिलेकडे रहाण्यासाठी गेल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

ही अपहृत तरुणी अनाथ असल्यामुळे ती नेरे येथील आश्रमात राहुन पनवेल मधील के.व्ही.कन्या शाळेत शिक्षण घेत होती. मात्र गत आठवड्यात सदर तरुणी आश्रमातून शाळेतुन गेली मात्र ती आश्रमात परतलीच नव्हती. त्यामुळे आश्रम व्यवस्थापनाकडून पनवेल शहर पोलीस ठाण्यात पार दाखल केली.

वाढदिवस

हंसिका मोटवाणी, अभिनेत्री
मृदुला घोडके, आकाशवाणी
अनुराधा औरंगाबादकर लेखिका

श्रीकर परदेशी, ज्येष्ठ आयएएस अधिकारी
अनिरुद्ध भाटे, नाटक

विवेक मुश्रन, अभिनेता
धनंजय कुलकर्णी, पत्रकार
संजीव साबडे, पत्रकार

दिनविशेष

साल घटना

१९७३ पिसाच्या मनोऱ्याचे बांधकाम सुरू झाले. हा मनोरा बांधण्यास २०० वर्षे लागली आणि चुकीने तो तिरका बांधला गेला.

१८९२ थॉमस एडिसन यांना दुहेरी तार यंत्राचे पेटंट मिळाले.

१९२५ चंद्रशेखर आझाद आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी काकोरी रेल्वे स्थानकावर सरकारी खजिना लुटला.

१९४२ क्रांतिदिन. भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्याच्या क्रांतीचे पर्व मुंबई येथून सुरू झाले.

१९४२ चले जावचा नारा दिल्याबद्दल महात्मा गांधींना अटक करण्यात आली.

१९४५ अमेरिकेने दुसरा अणुबॉंब जपानच्या नागासाकी या शहरावर टाकला.

१९६५ मलेशियातून बाहेर काढल्यामुळे सिंगापूर हा देश स्वतंत्र झाला.आपल्या इच्छेविरुद्ध स्वतंत्र झालेला हा जगातील एकमेव देश आहे.

१९९३ छोडो भारत चळवळीच्या सुवर्णजयंती सांगता समारंभानिमित्ताने सरहद गांधी खान अब्दुल गफार खान यांच्या टपाल तिकीटाचे प्रकाशन

पंचांग

पंचांग - आजमिती श्रावण शुध्द नवमी शके १९४१ शुध्द नवमी ०९:५९ मि.पर्यंत चंद्र नक्षत्र अनुराधा २१:५७ मि.पर्यंत योग ब्रह्मा ११:३५ मि.पर्यंत चंद्र राशी वृश्चिक. भारतीय सौर १८ श्रावण शके १९४१ म्हणजेच शुक्रवार ९ ऑगस्ट २०१९.मुंबई सूर्योदय - ०६:१७ मि. मुंबई सूर्यास्त - १९:१० मि. मुंबई चंद्रोदय - १४:१६ मि. मुंबई चंद्रास्त - २४:२५ मि. राहूकाळ - ११:०७ मि. ते १२:४३ मि.पर्यंत यमगंडकाळ - १५:५७ मि. ते १७:३३ मि.पर्यंत गुलिककाळ - ०७:५४ मि. ते ०९:३० मि.पर्यंत जरा-जिवंतिका पूजन, वरदलक्ष्मी व्रत, आगस्ती दर्शन

राशिभविष्य

मेष - परदेशी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थांसाठी अनुकूल, परदेशी जाण्यासाठी प्रयत्न करणाऱ्यांच्या प्रयत्नांना यश लाभेल.

वृषभ - नोकरी व्यवसाया निमित्त तसेच कौंटुबिक कारणांमुळे जवळचे तसेच दूरचे प्रवास घडतील.

मिथुन - व्यवसाय - धंद्यातील नियोजन पूर्ण करु शकाल. काही बाबतीत घेतलेले निर्णय योग्य ठरतील.

कर्क - व्यवसायात- कुटूंबात काही प्रकारच्या समस्यांना सोमोरे जावे लागल्याने विचारात पडाल.

सिंह - अनुकूलता लाभल्याने मनातील नियोजित कामे विनासायास पार पडतील. पण प्रयत्न मात्र हवेत.

कन्या - स्वत:च्या प्रकृतीस जपा. संसर्गजन्य बाधा होऊ शकते. खाण्यापिण्यावर नियंत्रण आवश्यक.

तुळ - आजू बाजूच्या घटना अनूकूल घडल्यामुळे तसेच कुटूंबात शुभवार्ता मिळाल्यामुळे आनंदी व उत्साही रहाल.

वृश्चिक - स्वभावात चंचलतेचा भाव विद्यामान राहील. अध्ययन करण्याची आवड राहील. पण स्वभावात थोडी उग्रता येण्याची शक्यता.

धनु - तुमच्या विचारात स्पष्टता असेल. कुटुंबामध्ये एखाद्या मुद्यावर जर मतभेद असतील तर ते विचार विनिमयाने मिटतील.

मकर - तुमचा आत्मविश्वास चांगला असेल. सत्ता आणि अधिकार मिळवण्यासाठी तुम्ही सातत्याने प्रयत्न कराल.

कुंभ - जागा आणि व्यवसायात चांगले बदल कराल. खर्चाला आळा घाला. कुटुंबातील गरजा पूर्ण कराव्या लागतील.

मीन - तुमची शारीरीक प्रकृती ठीक असेल. मनोबल आज चांगले असेल. कामात व्यक्तीमत्वाचा प्रभाव पडेल. तुमची कामे गोड बोलण्याने होतील. नविन संधी येतील. कामाचे नियोचन करूनच काम स्वीकारणे. अन्यथा कामाचा बोजा जास्त होईल. त्याचा मनावर ताण येईल.

महिला सहाय्यक आयुक्ताने रुजू होताच अवैध बांधकामावर मारला हातोडा !

पेल्हार विभागात अनधिकृत बॅनर आणि प्लास्टिक हटाव मोहिमेस प्रारंभ

वार्ताहर

वसई, दि. ८ -वसई विरार महापालिका वालीव प्रभाग समिती क्षेत्रात चाललेल्या प्रचंड अनधिकृत बांधकामामुळे सध्या महापालिका टीकेचे लक्ष झालेले असताना या समितीला लागूनच असलेल्या धानीव/पेल्हार प्रभाग समिती क्षेत्रात मात्र चार दिवसापूर्वीच बदली होऊन रुजू झालेल्या महिला प्रभारी सहाय्यक आयुक्त दीपाली ठाकूर यांनी उपायुक्त किशोर गवस यांच्या मार्गदर्शनात अनधिकृत बांधकामांविरोधात हातोडा उचलला आहे.

पेल्हार नाका आणि शिरसाड येथे अनधिकृत बांधकामांविरोधी पथकामार्फत आज केलेल्या कारवाईत सहा व्यापारी गाळे आणि पक्क्या बांधकामाच्या चार प्लिंथ (पाया)मिळून एकूण ६८०० चौरस मीटर बांधकाम जेसीबीच्या साहाय्याने भुईसपाट करण्यात आले आहे.

वसई विरार महापालिकेच्या मुख्यालयात माहिती अधिकार

विभागात कार्यरत असलेल्या प्रभारी सहाय्यक आयुक्त दीपाली ठाकूर यांची शनिवारी पेल्हार प्रभाग समिती मध्ये बदली झाली.

अवघ्या चार दिवसापूर्वीच सूत्रे हाती घेतलेल्या ठाकूर यांनी भर पेल्हार नाक्यावर असलेल्या सिगडी हॉटेल जवळील महापालिकेच्या जागेवर करण्यात आलेल्या चार व्यापारी गाळ्यावर आज जेसीबी चालवून सुमारे २८०० चौरस मीटरचे पक्के अनधिकृत बांधकाम पाडले.

त्याच बरोबर शिरसाड फाटा येथील मोठ्या बांधकामाकरिता उभारण्यात आलेल्या चार प्लिंथ (फाउंडेशन पाया)चे आणि दोन व्यापारी गाळ्यांचे मिळून सुमारे ४००० चौरस मीटर पक्के बांधकाम आजच्या कारवाईत भुईसपाट केले.

महिला होमगार्डच्या सुरक्षा पथकासह संजय पेडवी यांच्या ११ जणांच्या अनधिकृत बांधकाम विरोधी पथकाने या कारवाईत भाग घेतला. एकूण १३ वॉर्डच्या पेल्हार प्रभाग समिती क्षेत्रातून मुंबई-अहमदाबाद महामार्ग जात असून, या क्षेत्रात भूमाफिया अवैध निर्माण करून मोठा आर्थिक व्यवहार करीत असतात. या भागात आणखी अश्या कारवाईची गरज असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.

या प्रभागात गेल्या चार दिवसात अवैधपणे लावण्यात आलेल्या अनधिकृत बॅनर आणि फलकाविरोधात कारवाई करण्यात आली असून, येथील मार्केट परिसरात प्लस्टिक वापरावरील बंदीची अंमलबजावणी करण्यात येऊन, प्लास्टिक पिशव्या वापरणाऱ्या फेरीवाले आणि व्यापाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे.

येत्या १५ ऑगस्ट रोजी प्रभागात शाळकरी विध्यार्थी आणि लोकप्रतिनिधींच्या सहभागाने वृक्ष दिंडी काढण्यात येणार असून, ५०० वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे, असे दीपाली ठाकूर, प्रभारी सहाय्यक आयुक्त, धानीव/पेल्हार समिती यांनी सांगितले.

डोंबिवलीत पूरग्रस्तांचे सामान आणि वस्तू चोरीला...

पोलीस ठाण्यात तक्रार दाखल

वार्ताहर

डोंबिवली, दि. ८- कल्याण आणि डोंबिवली परिसरात मुसळधार पाऊस झाला होता. या पावसात अनेक चाळी व इमारतीत पाणी शिरले. याचा मोठा फटका नागरिकांना बसला. आठवडाभरापूर्वी अतिवृष्टीमुळे चाळ आणि झोपडपट्टीत पाणी शिरले होते.आपला जीव वाचवताना पूरग्रस्तांनी आपल्या घरातील समान आणि वस्तू घराबाहेर ठेवले.याचा फायदा चोरट्यांनी घेतला असून पूरग्रस्तांचे समान आणि वस्तू चोरले.भाजप डोंबिवली ग्रामीण मंडळ (अनुसूचित मोर्चा) अध्यक्ष गोरखनाथ महाले यांनी सहाय्यक पोलीस आयुक्त दिलीप राऊत यांना दिले आहे.

डोंबिवलीतील देवीचा पाडा, सत्यवान चौक, गोपीनाथ चौक,सरोवर नगर, नवीन देवीचा पाडा, जुनी डोंबिवली, आयरेगाव, मोठा गाव ठाकुर्ली , कोपर तर डोंबिवली ग्रामीण भागातील भोपर, नांदिवली येथील चाळीत पाणी शिरले होते.पाणी गेल्यावर पूरग्रस्तांनी आपल्या घरातील समान आणि वस्तू चाळीच्या जवळ ठेवले आहे.याचा फायदा चोरट्यांनी घेत यातील काही समान आणि वस्तू चोरी केल्याचा आरोप चोरले.भाजप डोंबिवली ग्रामीण मंडळ (अनुसूचित मोर्चा) अध्यक्ष गोरखनाथ महाले यांनी केला आहे.यासंदर्भात एक पत्र सहाय्यक पोलीस आयुक्त दिलीप राऊत यांना दिले आहे.

भंगारवाल्याची चांदी...

पुरपरिस्थितीमुळे एकीकडे ज्यांच्या घरात पाणी शिरल्याने संसार उद्ध्वस्त झाले आहेत. अनेकांचे फ्रीज, टीव्ही, वॉशिंग मशीन, मिक्सर आदी पाणी शिरल्याने खराब झाले आहेत. त्यात चिखल गेल्याने ते दुरुस्तीच्या पलिकडे गेले आहेत.

या पूरग्रस्तांच्य काही वस्तू , प्लास्टिक आणि इतर उपयोगात न येणारे समान फेकून दिले.हे भंगार घेण्यासाठी भंगारवाले या ठिकाणी फिरत असून या वस्तू येथील नागरिकांच्या परवानगीने घेऊन जात आहे.

रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री कुठे गेले ?

रायगडवासीयांचा आर्त सवाल

वार्ताहर

पेण दि. ८ - जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून मुसळधार पावसाने आणि पूर परिस्थितीने हाहाकार माजवला आहे. जिल्हा प्रशासन सर्व परिस्थितीवर नियंत्रण ठेवत आहे. परंतु, आश्चर्याची बाब म्हणजे जिल्ह्याचे पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांना मात्र पूर परिस्थितीबाबत सोयरसुतक नसल्याचे दिसत आहे. पालकमंत्र्यांच्या या भूमिकेकडे रायगडकर नाराजी व्यक्त करत आहेत.

जिल्ह्यात पावसाने हाहाकार माजवला असताना पालकमंत्री रवींद्र चव्हाण हे मात्र जिल्ह्यात फिरकलेच नाहीत. पालकमंत्री पक्ष वाढीसाठी जिल्ह्यात येतात. परंतु, कठीण परिस्थिती उद्भवली असताना पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांनी जिल्ह्यातील पूर भागाचा दौरा करणे आवश्यक होते. चव्हाण यांनी मात्र याकडे पाठ फिरवली.

जिल्ह्यात ४ ऑगस्टपासून मुसळधार पाऊस पडत आहे. पेण, महाड, पोलादपूर, माणगाव, म्हसळा, तळा, श्रीवर्धन, अलिबाग या तालुक्यात पूरस्थिती निर्माण झाली होती. पेण तालुक्यातील अंतोरे, कणे, वाशी या गावाला पुराच्या पाण्याने वेढले होते.

शेकडो नागरिक या पुराच्या पाण्यात अडकले होते. जिल्हा प्रशासन व पेण प्रशासनातर्फे एनडीआरएफ, कोस्टल गार्ड, स्थानिक संस्था यांच्या मदतीने नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आले.

महाड, पोलादपूर या तालुक्यात ५ दिवसांपासून पूरस्थिती आहे. याठिकाणच्या नागरिकांना एनडीआरएफ, सैन्य दल, कोस्टल पथकामार्फत सुरक्षित हलविण्यात आले.

रायगड जिल्ह्यातील मुसळधार पावसाने अनेक रस्ते वाहून गेले आहेत. त्यामुळे अनेक गावांचा संपर्क तुटलेला आहे. जिल्ह्यात कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

एअर इंडिया AIR INDIA
A STAR ALLIANCE MEMBER

निविदा निमंत्रणाची सूचना

सं.क्र. :पीएफ/डब्ल्युबी/बीओएम एचक्यु/०३ दिनांक : ०५/०८/१९

एअर इंडिया लि. खालील बाबींसाठी बोली मागवत आहे :

निविदा क्र.	वर्णन	निविदा मूल्य	समाप्तीची तारीख
पीएफ/सी/०८/१४ दि. ०२/०८/२०१९	ओल्ड एअरपोर्ट, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - २९ येथील एअर इंडिया आस्थापनांमध्ये वर्ष २०१९-२० साठी पाणी पुरवठा, प्लंबिंग, सॅनिटरी आणि ड्रेनेज इन्स्टॉलेशन्स चे प्रचालन आणि परिरक्षण	३२.७० लाख	०५/०९/१९

निविदा दस्तावेजांचे तपशील आमची वेबसाईट www.airindia.com वरून पाहता/डाऊनलोड करता येतील. कोणत्याही चौकशीसाठी, तुम्ही कृपया दूरध्वनी क्र. ०२२-२६२६५७५८/५६७०/५५९६ (ई-मेल - kr.kumar@airindia.in) येथे संपर्क साधा.

भिवंडीत अल्पवयीन मुला,मुलीचे अपहरण ; पालक वर्ग धास्तावला

वार्ताहर

भिवंडी, दि.८ - भिवंडी शहर परिसरातून अल्पवयीन मुला ,मुलींच्या अपहरणाच्या घटना दिवसेंदिवस वाढत आहे. शहरात दोन वेगवेगळ्या ठिकाणाहून एक १३ वर्षीय अल्पवयीन मुलगा व एक १७ वर्षीय मुलगी असे दोन अल्पवयीन मुला,मुलीचे अपहरण झाल्याच्या दोन घटना समोर आल्या आहेत.त्यामुळे परिसरातील पालक वर्ग कमालीचा धास्तावला आहे.

पहिल्या घटनेत कामतघर येथील राजीव नगरमध्ये राहणारा संतोषकुमार मुखीया (१३) हा मी बाहेर फिरून येतो असे सांगून ५ ऑगष्ट रोजी सकाळी १० वाजता घरातून निघून गेला आहे.मात्र तो तीन दिवस उलटूनही घरी परतला नाही.

तिच्या कुटुंबियांनी त्याचा परिसरात व नातेवाईकांकडे शोध घेण्यात आला मात्र तो सापडला नाही. त्यामुळे त्याचे अज्ञात व्यक्तीने फूस लावून अपहरण केले असावे अशी भीती निर्माण झाल्याने वडील रमेश बैजनाथ मुखीया यांनी नारपोली पोलीस ठाण्यात मुलाच्या अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे.या अपहरणाच्या गुन्ह्याचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक नितीन चौधरी करीत आहे.तर दुसऱ्या घटनेत मानसी बिल्डिंग ,पद्मानगर येथे राहणारी जान्हवी मान सिंग (१७) ही १२ वीत शिकत असून ती बुधवारी सकाळी ११ वाजेच्या सुमारास नेहमीप्रमाणे कॉलेजला गेली होती.

मात्र ती रात्री उशिरापर्यंत घरी परतली नाही.त्यामुळे तिचा नातेवाईक,मित्र,मैत्रिणींकडे शोध घेण्यात आला मात्र ती सापडली नाही.त्यामुळे तिच्या बालमनाचा गैरफायदा घेवून तिला कशाचे तरी आमीष दाखवून फूस लावून तिला अज्ञात इसमाने पळवून नेले असावे अशी खात्री पटल्याने तिचे वडिल मान भुपेंद्र सिंग यांनी शहर पोलीस ठाण्यात जान्हवी हिच्या अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे.

या गुन्ह्याचा पुढील तपास पोउनि.प्रल्हाद भामरे करीत आहे.

ठाण्यात रविवारी घर हक्क परिषदेचे आयोजन

ठाणे, दि. ८ (वार्ताहर)-ठाणे मतदाता जागरण अभियानातर्फे घर हक्क परिषदेचं आयोजन येत्या रविवारी करण्यात आलं आहे. श्रीनगरमधील श्रीनगर मंगल कार्यालयात ही परिषद होणार आहे. या परिषदेस मार्गदर्शन करण्यासाठी ज्येष्ठ नगर रचनाकार आणि अभ्यासक चंद्रशेखर प्रभु उपस्थित राहणार आहेत.

ठाणे महापालिकेतर्फे समूह विकास योजना राबवली जात आहे. या योजनेमध्ये किसननगर, कोपरी, हजुरी, लोकमान्यनगर, टेकडी बंगला आणि राबोडी येथे प्रायोगिक प्रकल्प केले जाणार आहेत. या भागातील नागरिकांना उठवून त्यांच्या इमारती पाडून त्या जागेवर नवीन इमारती बांधल्या जाणार आहेत.

त्या बदल्यात आज निवास करत असलेल्या नागरिकांना कायमस्वरूपी लीज अथवा भाड्याच्या घरात रहावं लागणार आहे.

अनेक सोसायट्यांच्या जमिनींचे मालकी हक्क जाणार आहेत. या बदल्यात नागरिकांच्या जागेवर बांधकाम व्यावसायिकाला ४ चटईक्षेत्र देऊन प्रचंड नफा कमावता येणार आहे. इतकी वर्ष राहत असलेल्या जागेत भाडेकरू म्हणून का रहायचे, बांधकाम व्यावसायिकानं नफा कमवायचा आणि रहिवाशांनी तोटा सहन करायचा हे कशासाठी आणि म्हणून शासन निर्णय बदलण्यासाठी संघटित होण्याकरिता या घरहक्क परिषदेचं आयोजन केले, असे सूत्रांनी सांगितले.

श ब्द वे ध 4193



Created By AMRITA NANDANWAR Mob 09822568532

उभे शब्द:- 1) अप्रगत, 2) वासाचा लोट, 3) गर्क, 4) डोळे फाडून पाहणे, 5) आजोबा, 6) ऑस्ट्रेलियातील एक प्राणी, 11) शंभर हजार, 13) अनोळखी, 15) लढाई, 17) कायदा, 19) दरोडेखोर, 22) टंचाई, 24) भीती, 25) शौर्य, 27) अभाव; तक्रार, 28) प्रेत, 29) मदार, 30) प्रत्येक.

(उत्तर: पुढील अंकात)

आडवे शब्द:- 2) पोटभर, 5) आक्रोश, 7) प्रतिष्ठा, 8) स्थान, 9) कुजका, 10) शीखधर्मीयांचे ईश्वरनाम; दुर्भिक्ष, 12) सौंदर्य, 14) नृत्य; ढीग, 16) पहारेकरी, 18) कोडकौतुक, 20) लुब्ध होणे, 21) चावून तोडलेला तुकडा, 23) भयभीत; व्याकुळ, 24) सापाची एक जात, 25) तारीफ, 26) एक पेय, 28) मतभेद, 30) ठोसा, 31) परभारे.

मागील कोड्याचे उत्तर

प्र	■	ज	रा	■	तु	च्छ	ता	■	ब
त्ये	■	ल	व	क	र	■	शा	दू	ल
क	पा	त	■	ल	ट	क	■	■	वा
■	■	र	ग	णे	■	व	र्त	मा	न
अ	ल	ग	■	■	बे	डी	■	भी	■
ढी	ग	■	मा	घा	र	■	झा	ल	र
■	ब	द	ल	■	की	ट	क	■	■
सो	ग	■	दा	स	■	प	ण	जो	बा
ड	■	स	र	सा	व	णे	■	शा	र

TATA
TATA STEEL LIMITED
Registered Offce: Bombay House, 24, Homi Mody Street, Fort, Mumbai - 400 001 India
Tel.: 91 22 6665 8282 • Fax No.: 91 22 6665 7724 • Email: cosec@tatasteel.com • Website: www.tatasteel.com
CIN: L27100MH1907PLC000260

सूचना

३० जून, २०१९ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी अलिप्त वित्तीय निष्कर्षांचा उतारा

₹ कोटी

तपशील	३०.०६.२०१९ रोजी संपलेली तिमाही	३१.०३.२०१९ रोजी संपलेली तिमाही	३०.०६.२०१८ रोजी संपलेली तिमाही	३१.०३.२०१९ रोजी संपलेले आर्थिक वर्ष
	लेखापरिक्षित	लेखापरिक्षित	लेखापरिक्षित	लेखापरिक्षित
प्रवर्तनातून एकूण महसूल	१६,०९१.३२	१९,१२९.५५	१६,४०५.४६	७०,६१०.९२
कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर आणि अपवादात्मक बाबींपूर्वी)	२,४४३.९०	३,८७६.२४	३,९०७.८६	१६,३४१.४८
कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर)	२,४०३.१५	३,८६५.२२	३,५७३.१७	१६,२२७.२५
कालावधीसाठी करोत्तर निव्वळ नफा/(तोटा)	१,५३८.९९	२,४९१.०९	२,३१८.१५	१०,५३३.१९
कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीसाठी नफा/(तोटा) (करोत्तर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करोत्तर) धरून)	१,४८९.४३	२,५२९.८४	२,३४०.६२	१०,४८२.९७
भरणा झालेले समभाग भांडवल (दर्शनी मूल्य ₹ १० प्रति भाग)	१,१४६.१२	१,१४६.१२	१,१४६.१२	१,१४६.१२
पुनर्मुल्यांकित राखीव वगळून राखीव				६९,३०८.५९
प्रत्येकी ₹ १० ची मूलभूत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबीनंतर)	१३.०५	२१.३७	१९.८५	९०.४१
प्रत्येकी ₹ १० ची सौम्यिकृत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर)	१३.०५	२१.३६	१९.८५	९०.४०

३० जून, २०१९ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी एकत्रित वित्तीय निष्कर्षांचा उतारा

₹ कोटी

तपशील	३०.०६.२०१९ रोजी संपलेली तिमाही	३१.०३.२०१९ रोजी संपलेली तिमाही	३०.०६.२०१८ रोजी संपलेली तिमाही	३१.०३.२०१९ रोजी संपलेले आर्थिक वर्ष
	अलेखापरिक्षित	अलेखापरिक्षित	अलेखापरिक्षित	लेखापरिक्षित
प्रवर्तनातून एकूण महसूल	३५,९४७.११	४२,४२३.८६	३५,४९४.०८	१,५७,६६८.९९
कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर आणि अपवादात्मक बाबींपूर्वी)	१,७९०.९५	४,२४१.०१	३,३४७.४३	१६,०२६.६९
कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर)	१,८०६.९५	४,२५२.५०	३,०१८.७९	१५,९०५.७२
अखंडित प्रवर्तनातून करोत्तर निव्वळ नफा/(तोटा)	६८३.१३	२,३५३.४४	१ ,९२२.८५	९,१८७.२९
खंडित प्रवर्तनातून करोत्तर निव्वळ नफा/(तोटा)	१८.८४	(५८.१९)	१०.९५	(८८.९६)
कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीसाठी नफा/(तोटा) (करोत्तर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करोत्तर) धरून)	३७६.१७	२,१९४.३६	३,६८१.०२	९,१०६.१२
भरणा झालेले समभाग भांडवल (दर्शनी मूल्य ₹ १० प्रति भाग)	१,१४४.९४	१,१४४.९४	१,१४४.९३	१,१४४.९४
राखीव (पुनर्मुल्यांकित राखीव वगळून) आणि अनियंत्रित व्याज				६७,८६९.६०
प्रति समभाग प्राप्ती (अखंडित प्रवर्तनासाठी) :				
प्रत्येकी ₹ १० ची मूलभूत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर)	५.६८	२०.८६	१६.५७	८८.३२
प्रत्येकी ₹ १० ची सौम्यिकृत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)- रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर)	५.६८	२०.८६	१६.५७	८८.३१
प्रति समभाग प्राप्ती (अखंडित आणि खंडित प्रवर्तनासाठी) :				
प्रत्येकी ₹ १० ची मूलभूत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर)	५.८३	२०.४४	१६.६६	८७.७५
प्रत्येकी ₹ १० ची सौम्यिकृत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर)	५.८३	२०.४४	१६.६६	८७.७४

टीपा :

सेबी (लिस्टिंग अँड अदर डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजेसमध्ये सादर केलेल्या ३० जून, २०१९ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी अलिप्त आणि एकत्रित वित्तीय निष्कर्षांच्या तपशीलवार विवरणाचा वरील एक उतारा आहे. ३० जून, २०१९ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी अलिप्त आणि एकत्रित निष्कर्षांचे संपूर्ण विवरण स्टॉक एक्स्चेंजेसच्या वेबसाईटस् (www.nseindia.com/www.bseindia.com) आणि कंपनीची वेबसाईट (www.tatasteel.com) वर उपलब्ध आहे.

टी. व्ही. नरेंद्रन
मुख्य कार्यकारी अधिकारी आणि
व्यवस्थापकीय संचालक

कौशिक चॅटर्जी
कार्यकारी संचालक आणि
मुख्य वित्तीय अधिकारी

मुंबई : ०७ ऑगस्ट, २०१९

TATA STEEL